Dnyandeep Shikshan Prasarak Mandal, Chandrapur

# Dr. Khatri Mahavidyalaya, Tukum Chandrapur

संस्थापक अध्यक्ष डॉ. एन. एच. खत्री सर जीवनसाधना गौरव पुरस्काराने सन्मानित.

स्थानिक डॉ. खत्री महाविद्यालय, तुकूम, चंद्रपूरचं संस्थापक अध्यक्ष आदरणीय डॉ. नंदकिशोर एच. खत्री सर यांना गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली तर्फे, "जीवन साधना गौरव पुरस्कार" बहाल करुन सन्मानित करण्यात आले. शैक्षणिक क्षेत्रातील अतिशय उल्लेखनिय कार्य शिवाय ग्रामीण व शहरी विद्यार्थीभिमुख उपक्रम आणि समाज जीवनात केलेल्या विविध मौलिक योगदानाची दखल घेऊन गोंडवाना विद्यापीठाने १४ व्या वर्धापन दिनी ६ आक्टोबर २०२५ रोजी हा मानाचा पुरस्कार प्रदान केला आहे.

याप्रसंगी महाविद्यालयात संस्थापक अध्यक्ष आदरणीय डॉ. एन.एच. खत्री सरांचा अभिनंदन सोहळा महाविद्यालयाचे सभागृहात दिनांक ०७ ऑक्टोबर २०२५ रोजी दुपारी ४ वाजता डॉ. एन.एच. खत्री सर यांचे अध्यक्षतेखाली थाटात संपन्न झाला. याप्रसंगी मंचावर उपस्थित संस्थेचे सचिव डॉ. एस.बी. कपूर संस्थेच्या कोषाध्यक्षा मा. अनुश्री पाराशर, महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. एस.बी. मोहितकर, श्री संजयजी पाराशर आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. एम. काकडे इत्यादी मान्यवर मंचावर उपस्थित होते.

याप्रसंगी या गौरवाबद्दल अभिनंदन करतांना प्राचार्य डॉ. जे. एम. काकडे म्हणाले की, संस्थापक अध्यक्षांच्या दुरदृष्टी, कार्यनिष्ठा आणि शैक्षणिक बांधीलकीमुळे आमचे महाविद्यालय आज नावारुपाला येऊन प्रगतीपथावर दिसते आहे. त्यांच्या कार्याचा सन्मान झाल्याने संपूर्ण महाविद्यालय परिवार स्वाभिमानाने आणि आनंदाने उभा आहे.

महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. एस.बी. मोहितकर यांनीही त्यांचे अभिनंदन केले आणि मौलिक असे मनोगत व्यक्त केले. डॉ. पी. एम. तेलखडे, डॉ. ज्योत्सना मोहितकर यांनीही मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी यांनीही आदरणीय डॉ. खत्री संराचे अभिनंदन केले.

कार्यक्रमाचे संचालन डॉ. आर. यु. मुरमाडे यांनी केले तर मान्यवरांचे आभार प्रा. संतोष कावरे यांनी मानले. डॉ. खत्री सरांना "जीवन साधना गौरव पुरस्कार" मिळाल्यामुळे महाविद्यालयाच्या सामाजिक व शैक्षणिक उपक्रमांना अधिक चालना मिळेल असा विश्वास सर्व मान्यवरांनी आपल्या मनोगतात व्यक्त केला. एकंदरीत अभिनंदन सोहळा फारच थाटात संपन्न झाला.




करिता गोंडवाना विद्यापीठ
गडचिरोली व्दारा


डॉ. खत्री महाविद्यालय सभागृह


डॉ. खत्री महाविद्यालय सभागृह


डॉ. खत्री महाविद्यालय सभागृह